**कासोळा (सं.) लघु पाटबंधारे योजना**
**ता. मंगरूळपीर जि. वाशिम**
**योजनेस व्दितीय सुधारीत प्रशासकीय**
**मान्यता प्रदान करणेबाबत.**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: ९३ विपाविम/कातां ७(१)/ (धा.क्र.१९३/२०१८)/कासोळा (सं.) लपायो / व्दितीय सुप्रमा / २०१८, दि. ०८/०१/२०१९**

**पहावे :-** १. शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र. संकिर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ९.९.२०१५.
२. विपाविम नियामक मंडळाचे ७१ व्या बैठकीतील ठराव क्र. ७१/५

**प्रस्तावाना :**

कासोळा (सं.) लघु पाटबंधारे योजना, ता.मंगरूळपीर, जि. वाशिम या योजनेस शासन निर्णय क्र. लपायो-२२०४/(२७४/०४)/लपा-२, दि. ७.१२.२००५ अन्वये रू. ३१४.०० लक्ष (रू. तीन कोटी, चौदा लक्ष फक्त) इतक्या किंमतीस (दरसुची २००३-०४ वर आधारीत) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

प्रकल्पास शासन निर्णय क्र. लपात -२२११/(६४/२०११)/लपा-२, दि. ७.७.२०१२ अन्वये रू. ७८२.०० लक्ष (रू. सात कोटी ब्याऐंशी लक्ष, फक्त) इतक्या किंमतीस (दरसुची २००९-१० वर आधारीत) प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल , इतर कारणे व अनुषंगिक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावात किंमत प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे व सदर प्रकल्प मा. राज्यपाल महोदयांच्या सिंचन अनुशेष निर्मुलन कार्यक्रमा अंतर्गत असल्याने व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे .

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये वाशिम जिल्ह्यातील कासोळा (सं.) लघु पाटबंधारे योजना, ता.मंगरूळपीर जि. वाशिम या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रू. ९६९.०० लक्ष (रू. नऊ कोटी, एकोणसत्तर लक्ष फक्त) किंमतीस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू.९५९.०० लक्ष (रू. नऊ कोटी एकोणसाठ लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. १०.०० लक्ष (रू. दहा लक्ष फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१३-१४ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

ठळक बाबी –

| | |
|---|---|
| **अ) योजनेचे सिंचन क्षेत्र** | **- २६० हेक्टर** |
| **ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा** | **- १.६०५२ द.ल.घ.मी. (१६०५.२ स.घ.मी.)** |
| **क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत** | **- रू. ६०३६९/-(मापदंड रू.९५७९० x ८०%=७६६३२/- प्रती स.घ.मी.)** |
| **ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** | **- १.०८ (मापदंड १.०० पेक्षा जास्त)** |